वार | दि. २७ जून २०११ | तरुण भारत






पूर : शाहू जयंतीनिमित्त शहरातून काढण्यात आलेली समता दिंडी. दसरा चौकातील शाहू महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करताना हर्षवर्धन पाटील, सतेज पाटील, श्रीमंत शाहू महाराज, वंदना बु

# ाहूंचे विचार विसरून जगणे अशक्य : कणबरकर

## ाबुराव धारवाडे, डॉ.रा.कृ.कणबरकर यांना राजर्षि शाहू पुरस्कार प्रदान

ापूर / प्रतिनिधी

दलितांचा कैवारी, समाजोध्दारक ना राजर्षि छत्रपती शाहू महाराज ही व्य... नसून तो शाश्वत विचार आहे. दे... पुरोगामीत्वाचा वसा देणाऱ्या या विचार विसरून समाज जगूच शकणार अशा शब्दात शाहूराजांची महती गात मुळेच मी घडलो अशी कृतज्ञता माजी ा प्राचार्य डॉ. रा.कृ. कणबरकर यांनी केली. बहुजनांच्या दैवतांवर शिंतोडे ाचं काम कायमच समाजात होत त्याला शाहूंचे विचारच प्रत्युत्तर देतील आशावाद प्रकट करून शाहू स्मारक केंद्र सुधारणेचे केंद्र बनावे, अशी इच्छाही केली.

ू मेमोरियल ट्रस्टतर्फे दिला जाणारा राजर्षि पुरस्कार यंदा माजी आमदार बाबुराव डे व माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर संयुक्तपणे पालकमंत्री हर्षवर्धन पाटील हस्ते प्रदान करण्यात आला. शाहू ा भवनमध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या ास्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील होते. सत्काराला उत्तर देताना कणबरकर बोलत होते.

शाहू पुरस्कारांच्या निमिताने जमलेला जनसमुदाय पाहून शाहू विचार रूजवण्याच्या आजवर केलेल्या प्रयत्नांना फळ आले असून माझा ऊर भरून आला आहे असे भावोद्गार कणबरकर यांनी काढले. शाहू विचाराचं महत्व समाजाला नव्हे तर शासनाला पटवून देण्यात आम्ही यशस्वी झाल्याचं समाधान वाटत असल्याचेही त्यांनी सांगितले. शिक्षकांविषयी बोलताना समाज बांधणीचं ते घडवण्याचे जोखमीचे काम शिक्षकांवर असते, ते त्यांनी जबाबदारीने पार पाडावे असा सल्लाही त्यांनी दिला. तसेच शाहू स्मारक हे विचारांचे केंद्र आहे, ते समाजसुधारणेचे केंद्र होण्यासाठी शासनाने निधीसाठी दुर्लक्ष करू नये. वर्षभरापूर्वी तत्कालिन-मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शाहू स्मारकसाठी दोन कोटी रुपयांचा निधी देण्याचे जाहीर केले होते. पण आजतागायत त्यातील एक पै ही मिळालेली नाही. त्यामुळे शाहूंच्या नावावर केवळ घोषणा करुन त्यांची उपेक्षा करु नका, असेही सांगितले.

हर्षवर्धन पाटील यांनी धारवाडे व कणबरकर यांच्या रूपाने शाहू महाराजांच्या विचारकार्याचा वसा तळागाळापर्यंत पोहचवणाऱ्यांचा सत्कार झाला आहे, आणि तो माझ्या हस्ते होत असल्यामुळे अधिक आनंद होत असल्याचे सांगितले. हे दोघे सत्कारमूर्ती तत्वनिष्ठ असून आजच्या पिढीला त्यांची गरज आहे. त्यांच्यामुळे पुरस्काराची उंची वाढली असून भविष्यात मोठे पुरस्कार्थी निवडण्याची कसोटी लागणार आहे. या दोघांनीही वयाची शंभरी गाठावी अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. डॉ. एन. डी.पाटील यांनी शाहूंच्या विचाराने झपाटलेल्या मंथरलेल्या कार्यकर्त्यांचा झालेला गौरव हा प्रत्येकाला आपला सन्मान वाटत असल्याचे भावोद्गार काढले.

स्वागत डॉ. सुनिलकुमार लवटे यांनी केले, प्रास्ताविक जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले. मानपत्र वाचन अशोक चौसाळकर यांनी केले. शाहीर आझाद नायकवडी यांनी शाहू गौरव गीत सादर केले. यावेळी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, विशेष पोलीस महानिरीक्षक तुकाराम चव्हाण, जयसिंगराव पवार, संजय पवार, रमेश पवार, दिपक म्हैसेकर, सुभाष बोरकर उपस्थित होते.

### पुरस्काराची रक्कम शिष्यवृत्तीसाठी

शाहू पुरस्काराची एकूण रक्कम १ लाख आहे. दोघांना विभागून हा पुरस्कार दिल्याने ५० हजारामध्ये स्वतःकडील पाच हजार रुपये घालून ही रक्कम प्राचार्य कणबरकर यांनी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्याकडे सुपुर्द केली. या रकमेतून दहावीत प्रथम येणाऱ्या जिल्ह्यातील विद्यार्थ्याला दरवर्षी शिष्यवृत्ती देण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले.

### सभागृह हाऊसफुल्ल

गेल्या २५ वर्षापासून सुरू असलेल्या शाहू पुरस्कारावेळी गर्दी ही ठरलेली असते. यंदाही त्याचे प्रत्यंतर आले. कार्यक्रम सुरू व्हायच्या आधीच सभागृह हाऊलफुल्ल झाले होते. बाहेरही स्क्रीनची सुविधा करण्यात आली होती. बसायला जागा न मिळालेल्या लोकांनी उभे राहूनच हा सोहळा डोळ्या आणि कानात साठवण्याचा प्रयत्न केला.